भारत सरकार

**विधि, न्याय व कंपनीकार्य मंत्रालय**

सत्यमेव जयते

# सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७

**(सन १९८८ चा अधिनियम क्रमांक ३)**

[दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान]

# The Commission of Sati (Prevention) Act, 1987

**(Act No. 3 of 1988)**

**[ As in force on the 31st January, 2002]**

संचालक, मुद्रण व लेखनसामग्री, महाराष्ट्र शासन यांनी
भारत सरकारच्या वतीने मुद्रित व प्रकाशित केले
२००४

**[ किंमत : रु. ५.०० ]**

## प्राक्कथन

या आवृत्तीत, दिनांक ३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान असलेला दि कमिशन ऑफ सती (प्रिव्हेन्शन) ॲक्ट, १९८७ याचा मराठीतील प्राधिकृत पाठ दिलेला आहे. हा पाठ **भारताचे राजपत्र**, असाधारण, भाग बारा, अनुभाग १, खंड १२, अंक १, दिनांक २३ जानेवारी, २००३ यात पृष्ठ ११ ते १६ मध्ये प्रकाशित करण्यात आला होता. हा प्राधिकृत मराठी पाठ, प्राधिकृत पाठ (केंद्रीय विधि) अधिनियम, १९७३ याच्या कलम २, खंड (क) अन्वये राष्ट्रपतींच्या प्राधिकाराने प्रकाशित करण्यात आला होता आणि अशा रीतीने प्रकाशित करण्यात आल्यानंतर हा पाठ, उक्त अधिनियमाचा प्राधिकृत मराठी पाठ म्हणून समजण्यात आला आहे.

नवी दिल्ली,
दिनांक २३ जानेवारी, २००३.

**सुभाष सी. जैन,**
सचिव, भारत सरकार.

## PREFACE

This edition of the Commission of Sati (Prevention) Act, 1987 as on the 31st January 2002 contains the authoritative text of that Act in Marathi which was published in *Gazette of India*, Extraordinary Part XII, Section 1, No. 1, Vol. 12, dated 23rd January, 2003 on pages 11 to 16.

This authoritative text was published under the authority of the President under Section 2, Clause (*a*) of the Authoritative Texts (Central Laws) Act, 1973 and on such publication it became the authoritative text of that Act in Marathi.

New Delhi,
Dated 23rd January, 2003.

SUBHASH C. JAIN,
Secretary to the Government of India.

एच ४२४६—१ (१०३५—१–२००४)

# सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७

## कलमांचा क्रम


### भाग एक

#### प्रारंभिक

१. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.
२. व्याख्या.

### भाग दोन

#### सतीशी संबंधित अपराधांकरता शिक्षा

३. सती जाण्याचा प्रयत्न करणे.
४. सतीला अपप्रेरणा देणे.
५. सतीला गौरवान्वित करण्याबद्दल शिक्षा.

### भाग तीन

#### सतीशी संबंधित अपराधांस प्रतिबंध करण्याच्या जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांच्या शक्ती

६. विवक्षित कृतीस प्रतिषेध करण्याची शक्ती.
७. विवक्षित मंदिरे किंवा इतर बांधकाम काढून टाकण्याची शक्ती.
८. विवक्षित संपत्ती अभिगृहित करण्याची शक्ती.

### भाग चार

#### विशेष न्यायालये

९. या अधिनियमाखालील अपराधाची संपरीक्षा.
१०. विशेष सरकारी अभियोक्ते.
११. विशेष न्यायालयांची कार्यपद्धती व शक्ती.
१२. विशेष न्यायालयाची इतर अपराधांच्या संबंधातील शक्ती.
१३. निधीचे किंवा संपत्तीचे समपहरण.
१४. अपील.

### भाग पाच

#### संकीर्ण

१५. या अधिनियमान्वये केलेल्या कृतीला संरक्षण.
१६. शाबितीची जबाबदारी.
१७. या अधिनियमाखालील अपराध घडल्याचे कळवण्याचे विवक्षित व्यक्तींवरील आबंधन.
१८. कलम ४ खालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली व्यक्ती विवक्षित संपत्ती वारसाने मिळवण्यास निरर्ह ठरणे.
१९. १९५१ चा अधिनियम ४३ याचे विशोधन.
२०. अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.
२१. नियम करण्याची शक्ती.
२२. विद्यमान कायद्यांचे निरसन.

# सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७

## (१९८८ चा अधिनियम क्रमांक ३)

(३१ जानेवारी, २००२ रोजी यथाविद्यमान) [३ जानेवारी, १९८८]

सती जाणे व सतीला गौरवान्वित करणे व त्याच्याशी संबंधित व आनुषंगिक बाबी यांना अधिक परिणामक प्रतिबंध करण्याकरता अधिनियम.

ज्याअर्थी, सती किंवा विधवांना किंवा स्त्रियांना जिवंत जाळणे किंवा पुरणे मानवी संवेदनांना उद्वेगजनक वाटते आणि भारतातील कोणत्याही धर्माने कोठेही एक आवश्यक कर्तव्य म्हणून त्याची आज्ञा दिलेली नाही ;

आणि ज्याअर्थी, सती जाणे व सतीला गौरवान्वित करणे यांस प्रतिबंध करण्याकरता जास्त परिणामक उपाययोजना करणे आवश्यक आहे ;

त्याअर्थी, याद्वारे भारतीय गणराज्याच्या अडतिसाव्या वर्षी पुढीलप्रमाणे अधिनियम करण्यात येवो :—

### भाग एक

### प्रारंभिक

१. (१) या अधिनियमास "सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७" असे म्हणावे. संक्षिप्त नाव, विस्तार व प्रारंभ.

(२) त्याचा विस्तार, जम्मू व काश्मीर राज्य खेरीजकरून संपूर्ण भारतभर आहे.

(३) केंद्र सरकार **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे नियत करील अशा दिनांकास तो एखाद्या राज्यात अंमलात येईल आणि वेगवेगळ्या राज्यांकरता वेगवेगळे दिनांक नियत करता येतील.

२. (१) या अधिनियमात, संदर्भानुसार अन्यथा आवश्यक नसेल तर,— व्याख्या.

(क) "संहिता" याचा अर्थ, "फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३" (१९७४ चा २), असा आहे;

(ख) सतीच्या संबंधात "गौरवान्वित करणे" यात—मग ते सती जाणे या अधिनियमाच्या प्रारंभापूर्वी घडलेले, असो किंवा नंतर—इतर गोष्टींबरोबर पुढील गोष्टींचाही समावेश आहे :—

(एक) सती जाण्याच्या संबंधात कोणताही समारंभ साजरा करणे किंवा मिरवणूक काढणे; अथवा

(दोन) सतीच्या प्रथेस कोणत्याही रीतीने पाठिंबा देणे, तिचे समर्थन करणे किंवा तिचा प्रचार करणे; अथवा

(तीन) सती गेलेल्या व्यक्तीचे गुणगान करण्याकरिता एखादा समारंभ आयोजित करणे ; अथवा

(चार) सती गेलेल्या व्यक्तीचा बहुमान शाश्वत करण्याकरता किंवा तिची स्मृती जतन करण्याकरिता एखादा न्यास स्थापन करणे, किंवा निधी गोळा करणे, किंवा मंदिर किंवा इतर बांधकाम करणे, किंवा त्या ठिकाणी कोणत्याही स्वरूपाची पूजाअर्चा चालू ठेवणे किंवा कोणताही समारंभ घडवून आणणे ;

(ग) "सती" याचा अर्थ—

(एक) एखाद्या विधवेला तिच्या मृत पतीच्या किंवा कोणत्याही इतर नातेवाईकाच्या शवासह किंवा पतीशी किंवा अशा नातेवाईकाशी संबंधित कोणतीही वस्तू, जिन्नस किंवा गोष्ट यांसह जिवंत जाळणे किंवा पुरणे; अथवा

(दोन) विधवेचे किंवा स्त्रीचे असे जाळणे किंवा पुरले जाणे हे तिने स्वेच्छेने केले असल्याचा दावा करण्यात आलेला असला किंवा नसला तरी, कोणत्याही स्त्रीला तिच्या एखाद्या नातेवाईकाच्या शवासह जिवंत जाळणे किंवा पुरणे,

असा आहे.

(घ) "विशेष न्यायालय" याचा अर्थ, कलम ९ अन्वये घटित केलेले विशेष न्यायालय, असा आहे ;

(ङ) "मंदिर" यामध्ये जी व्यक्ती सती गेली असेल तिची स्मृती जतन करण्याकरता किंवा कोणत्याही प्रकारची पूजा-अर्चा चालू ठेवण्याकरता वापरण्यात येणारी किंवा वापरण्याचा उद्देश असलेली किंवा अशा सती जाण्याच्या संबंधातील कोणताही समारंभ करण्याकरता बांधलेली किंवा तयार केलेली कोणतीही इमारत किंवा इतर बांधकाम—मग त्यावर छप्पर घातलेले असो किंवा नसो यांचा समावेश आहे.

(२) या अधिनियमात वापरलेल्या परंतु व्याख्या न केलेल्या आणि "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) किंवा संहिता यामध्ये व्याख्या केलेल्या शब्दांना आणि शब्दप्रयोगांना, "भारतीय दंड संहिता" किंवा संहिता यामध्ये त्यांना अनुक्रमे नेमून दिलेलेच अर्थ असतील.

## भाग दोन

### सतीशी संबंधित अपराधांकरता शिक्षा

सती जाण्याचा प्रयत्न करणे. ३. "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) यात काहीही अंतर्भूत असले तरीही, जो कोणी सती जाण्याचा प्रयत्न करील आणि अशा सती जाण्याच्या दिशेने कोणतीही कृती करील त्यास एक वर्षापर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची किंवा द्रव्यदंडाची किंवा या दोन्ही शिक्षा दिल्या जातील :

परंतु, या कलमान्वये एखाद्या अपराधाची संपरीक्षा करणारे विशेष न्यायालय कोणत्याही व्यक्तीस सिद्धदोष ठरवण्यापूर्वी, जिची परिणती अपराध घडण्यात झाली ती परिस्थिती, केलेली कृती, अपराधाचा आरोप असलेल्या व्यक्तीची, कृती करण्यात आली त्यावेळची मन:स्थिती आणि इतर सर्व संबद्ध घटक विचारात घेईल.

सतीला अपप्रेरणा देणे. ४. (१) "भारतीय दंड संहिता" (१८६० चा ४५) यामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी एखादी व्यक्ती सती गेली तर जो कोणी अशा प्रकारे तिला सती जाण्यास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अपप्रेरणा देईल त्याला मृत्युदंडाची किंवा जन्मठेपेची शिक्षा दिली जाईल. आणि तो द्रव्यदंडासुद्धा पात्र असेल.

(२) एखादी व्यक्ती सती जाण्याचा प्रयत्न करील तेव्हा जो कोणी अशा प्रयत्नास प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे अपप्रेरणा देईल, त्याला जन्मठेपेची शिक्षा दिली जाईल, आणि तो द्रव्यदंडासुद्धा पात्र असेल.

**स्पष्टीकरण.**—या कलमाच्या प्रयोजनार्थ पुढीलपैकी कोणतीही किंवा तत्सम कृती अपप्रेरणा असल्याचे मानण्यात येईल; त्या कृती अशा—

(क) एखाद्या विधवेला किंवा स्त्रीला, ती योग्य मनस्थितीत आहे किंवा नाही किंवा ती नशेच्या किंवा मूर्च्छेच्या अवस्थेत आहे किंवा नाही, किंवा तिला ज्यामुळे तिच्या स्वत:च्या इच्छेचा स्वतंत्रपणे वापर करण्यात विघ्न येईल असे इतर कारण यांचा विचार न करता, आपल्या मृत पतीच्या किंवा इतर कोणत्याही नातेवाईकाच्या शवासह किंवा पतीशी किंवा अशा नातेवाईकाशी संबंधित कोणतीही वस्तू, जिन्नस किंवा गोष्ट यांच्यासह जिवंत जाळून किंवा पुरून घेण्याकरता कोणतेही प्रलोभन दाखवणे ;

(ख) सती जाण्यामुळे तिला किंवा तिच्या मृत पतीला किंवा नातेवाईकाला काही अध्यात्मिक लाभ मिळणार आहे किंवा तिच्या कुटुंबाचे सर्वसाधारण कल्याण होणार आहे, असा एखाद्या विधवेचा किंवा स्त्रीचा समज करून देणे ;

(ग) एखाद्या विधवेला किंवा स्त्रीला सती जाण्याचा तिचा निश्चय ठाम राहावा म्हणून उत्तेजन देणे आणि अशाप्रकारे तिला सती जाण्यास चिथावणी देणे ;

(घ) सती जाण्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही मिरवणुकीत सहभागी होणे किंवा त्या विधवेला किंवा स्त्रीला तिच्या मृत पतीच्या किंवा नातेवाईकाच्या शवासह दहनभूमीकडे किंवा दफनभूमीकडे नेऊन सती जाण्याच्या तिच्या निर्णयात साह्यभूत होणे ;

(ङ) जेथे सती जाणे घडत असेल त्या ठिकाणी किंवा त्याच्याशी संबंधित असलेल्या कोणत्याही समारंभात अशा घटनेतील एक सक्रिय सहयोगी म्हणून उपस्थित राहणे ;

(च) विधवेला किंवा स्त्रीला स्वत:ला जळण्यापासून किंवा पुरण्यापासून वाचविण्यास प्रतिबंध करणे किंवा अडवणे ;

(छ) सतीच्या घटनेस प्रतिबंध करण्याकरता उपाययोजना करून आपली कर्तव्ये पार पाडणाऱ्या पोलिसास आडकाठी करणे किंवा त्याच्या कामात हस्तक्षेप करणे.

सतीला गौरवान्वित करण्याबद्दल शिक्षा. ५. सतीला गौरवान्वित करण्यासाठी जो कोणी एखादी कृती करील त्यास कमीत कमी एक वर्ष परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल एवढ्या मुदतीच्या कारावासाची आणि कमीत कमी पाच हजार रुपये परंतु, तीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

## भाग तीन

### सतीशी संबंधित अपराधांस प्रतिबंध करण्याच्या जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांच्या शक्ती

विवक्षित कृतीस प्रतिबंध करण्याची शक्ती.

६. (१) ज्यावेळी जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांचे असे मत असेल की, सती जाणे किंवा त्यास अपप्रेरणा देणे घडत आहे किंवा घडण्याच्या बेतात आहे तर तो आदेशाद्वारे त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रांत कोणत्याही व्यक्तीच्या सती जाण्याच्या दृष्टीने होणाऱ्या कोणत्याही कृतीस प्रतिषेध करू शकेल.

(२) जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी आदेशाद्वारे त्या आदेशामध्ये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही क्षेत्रात किंवा क्षेत्रांत कोणत्याही व्यक्तीद्वारे सतीस कोणत्याही पद्धतीने गौरवान्वित केले जाण्यास प्रतिषेध करु शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे जो कोणी उल्लंघन करील तो या अधिनियमाच्या कोणत्याही इतर उपबंधानुसार शिक्षापात्र नसेल तर, त्यास कमीत कमी एक वर्ष परंतु सात वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कारावासाची शिक्षा आणि कमीत कमी पाच हजार रुपये परंतु तीस हजार रुपयांपर्यंत असू शकेल इतक्या द्रव्यदंडाची शिक्षा दिली जाईल.

विवक्षित मंदिरे किंवा इतर बांधकामे काढून टाकण्याची शक्ती.

७. (१) जी कोणतीही व्यक्ती सती गेली असेल तिचा बहुमान (शाश्वत) करण्याकरता किंवा तिची स्मृती जतन करण्याकरता किमान वीस वर्षे अस्तित्वात असलेल्या एखाद्या मंदिरात किंवा इतर बांधकामात कोणत्याही स्वरुपाची पूजा-अर्चा किंवा कोणताही समारंभ करण्यात येतो याबद्दल राज्य शासनाची खात्री पटली असेल तर ते शासन, आदेशाद्वारे असे मंदिर किंवा इतर बांधकाम काढून टाकण्याचा निदेश देऊ शकेल.

(२) जी कोणतीही व्यक्ती सती गेली असेल तिचा बहुमान करण्याकरता किंवा तिची स्मृती जतन करण्याकरिता पोटकलम (१) मध्ये निर्देशित केलेल्या व्यतिरिक्त इतर कोणत्याही मंदिरात किंवा बांधकामात कोणत्याही स्वरूपाची पूजा-अर्चा किंवा कोणताही समारंभ करण्यात येतो याबद्दल जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी यांची खात्री पटली असेल तर तो, आदेशाद्वारे असे मंदिर किंवा इतर बांधकाम काढून टाकण्याचा निदेश देऊ शकेल.

(३) पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) अन्वये देण्यात आलेल्या कोणत्याही आदेशाचे अनुपालन करण्यात आले नाही तर राज्य शासन, किंवा प्रकरणपरत्वे, जिल्हाधिकारी, किंवा जिल्हा दंडाधिकारी कसूरदाराच्या खर्चाने फौजदारापेक्षा कमी दर्जाचा नसेल अशा पोलीस अधिकाऱ्यामार्फत असे मंदिर किंवा इतर बांधकाम काढून टाकण्याची व्यवस्था करील.

विवक्षित संपत्ती अभिगृहित करण्याची शक्ती.

८. (१) कोणत्याही सतीस गौरवान्वित करण्याच्या प्रयोजनार्थ कोणताही निधी गोळा करण्यात आला आहे किंवा संपत्ती संपादित करण्यात आली आहे असे समजण्यास जिल्हाधिकाऱ्यास किंवा जिल्हा दंडाधिकाऱ्यास कारण असेल किंवा या अधिनियमाखाली कोणताही अपराध घडला असल्याचा संशय ज्यातून निर्माण होईल अशा परिस्थितीत असा निधी किंवा संपत्ती सापडली असेल तर तो असा निधी किंवा संपत्ती अभिगृहित करू शकेल.

(२) पोटकलम (१) अन्वये कार्य करणारा प्रत्येक जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी ज्या अपराधाच्या संबंधात असा निधी गोळा करण्याच्या किंवा संपत्ती संपादित करण्याच्या संबंधातील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करण्याकरता कोणतेही विशेष न्यायालय घटित केले असल्यास, अभिकरणाचा अहवाल त्याच्याकडे पाठवील आणि त्याची विल्हेवाट लावण्याच्या संबंधात अशा विशेष न्यायालयाच्या आदेशांची प्रतीक्षा करील.

## भाग चार

### विशेष न्यायालये

या अधिनियमाखालील अपराधांची संपरीक्षा.

९. (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरीही, या अधिनियमाखालील सर्व अपराध, या कलमान्वये घटित केलेल्या एखाद्या विशेष न्यायालयाद्वारेच संपरीक्षणीय असतील.

(२) या अधिनियमाखालील अपराधांची संपरीक्षा करण्याकरिता राज्य शासन, **शासकीय राजपत्रातील** अधिसूचनेद्वारे एक किंवा अधिक विशेष न्यायालये घटित करील आणि प्रत्येक विशेष न्यायालय संपूर्ण राज्यावर किंवा राज्याच्या, त्या अधिसूचनेमध्ये विनिर्दिष्ट करण्यात येईल अशा भागावर, अधिकारितेचा वापर करील.

(३) उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायमूर्तींच्या सहमतीने, राज्य शासन नियुक्त करील असा न्यायाधीश विशेष न्यायालयाचा पीठासीन अधिकारी असेल.

(४) एखादी व्यक्ती, तिच्या विशेष न्यायालयाचा न्यायाधीश म्हणून नियुक्तीच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात सत्र न्यायाधीश किंवा अतिरिक्त सत्र न्यायाधीश असल्याखेरीज, ती असा न्यायाधीश म्हणून नियुक्त होण्यास अर्ह असणार नाही.

**विशेष सरकारी अभियोक्ते.** १०. (१) प्रत्येक विशेष न्यायालयाकरता, राज्य शासन एखाद्या व्यक्तीची विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नेमणूक करील.

(२) एखादी व्यक्ती किमान सात वर्षे अभियोक्ता म्हणून व्यवसाय करीत असेल किंवा तिने राज्यातील कायद्याचे विशेष ज्ञान आवश्यक असणारे एखादे पद किमान सात वर्षे धारण केले असेल तरच ती व्यक्ती या कलमान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्ती केली जाण्यास पात्र असेल.

(३) या कलमान्वये विशेष सरकारी अभियोक्ता म्हणून नियुक्त करण्यात आलेली प्रत्येक व्यक्ती ही संहितेच्या कलम २ च्या खंड (प) च्या अर्थांतर्गत सरकारी अभियोक्ता असल्याचे मानण्यात येईल आणि संहितेचे उपबंध तद्नुसार परिणामक होतील.

**विशेष न्यायालयांची कार्यपद्धती व शक्ती.** ११. (१) ज्या तथ्यामुळे असा अपराध घटित होतो अशा तथ्याविषयीची तक्रार मिळाल्यानंतर किंवा अशा तथ्याविषयीचा पोलीस अहवाल मिळाल्यानंतर, विशेष न्यायालय, अशा कोणत्याही अपराधाची, आरोपीस संपरीक्षेसाठी त्याच्या सुपूर्द करण्यात आलेले नसले तरी, दखल घेऊ शकेल.

(२) या अधिनियमाच्या इतर उपबंधांच्या अधीनतेने, विशेष न्यायालयास कोणत्याही अपराधाच्या संपरीक्षेच्या प्रयोजनार्थ, सत्र न्यायालयाच्या सर्व शक्ती असतील आणि ते, शक्य तेथवर, एखाद्या सत्र न्यायालयापुढील संपरीक्षेकरता संहितेमध्ये विहित करण्यात आलेल्या कार्यपद्धतीनुसार, ते जणू काय सत्र न्यायालयच असल्याप्रमाणे, अशा अपराधाची संपरीक्षा करील.

**विशेष न्यायालयांची इतर अपराधांच्या संबंधातील शक्ती.** १२. (१) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाची संपरीक्षा करतेवेळी, विशेष न्यायालय, संहितेन्वये आरोपीवर त्याच संपरीक्षेत ज्या अन्य अपराधाचा आरोप करण्यात आला असेल अशा अन्य अपराधाशी तो अपराध संबंधित असेल तर, कोणत्याही अन्य अपराधाचीही संपरीक्षा करू शकेल.

(२) या अधिनियमाखालील कोणत्याही अपराधाच्या संपरीक्षेच्या ओघात जर असे आढळून आले असेल की, आरोपी व्यक्तीने, या अधिनियमाखालील किंवा कोणत्याही इतर कायद्याखालील कोणताही इतर अपराध केला आहे तर, विशेष न्यायालय, अशा व्यक्तीला अशा इतर अपराधाबद्दलसुद्धा सिद्धदोष ठरवू शकेल आणि तिला या अधिनियमान्वये किंवा त्याबद्दलच्या शिक्षेसाठी असलेल्या अशा इतर कायद्यान्वये कोणतीही शिक्षा देऊ शकेल.

(३) प्रत्येक चौकशीत किंवा संपरीक्षेत, कार्यवाही शक्य तितक्या शीघ्रतेने चालवण्यात येईल आणि विशेषत: जेथे साक्षीदारांची तपासणी सुरु झाली असेल तेथे उपस्थित असलेल्या सर्व साक्षीदारांची तपासणी केली जाईपर्यंत ती दररोज चालू राहील आणि कोणत्याही विशेष न्यायालयास, ती पुढील दिनांकापलीकडे तहकूब करणे आवश्यक आहे असे आढळल्यास ते तसे करण्याची कारणे अभिलिखित करील.

**निधीचे किंवा संपत्तीचे समपहरण.** १३. ज्यावेळी या अधिनियमाखालील अपराधाकरता एखादी व्यक्ती सिद्धदोष ठरली असेल त्यावेळी अशा अपराधाची संपरीक्षा करणारे विशेष न्यायालय, त्याला तसे करणे आवश्यक वाटल्यास, कलम ८ अन्वये अभिगृहित केलेले कोणतेही निधी किंवा संपत्ती राज्याकडून समपहृत झाल्याचे घोषित करु शकेल.

**अपील.** १४. (१) संहितेमध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, एखाद्या विशेष न्यायालयाचा कोणताही न्यायनिर्णय, शिक्षादेश किंवा आंतर्वादिक आदेश नसणारा आदेश यावर त्यातील तथ्ये व कायदा या दोन्हींबाबत हक्काची बाब म्हणून उच्च न्यायालयाकडे अपील करता येईल.

(२) या कलमाखालील प्रत्येक अपील हे, ज्यावर अपील केले असेल त्या न्यायनिर्णयाच्या, शिक्षादेशाच्या किंवा आदेशाच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या कालावधीच्या आत करण्यात येईल :

परंतु, तीस दिवसांच्या कालावधीच्या आत अपील न करण्यास अपीलकर्त्यास पुरेसे कारण होते याबाबत उच्च न्यायालयाची खात्री पटली असली तर, ते न्यायालय उक्त तीस दिवसांचा कालावधी संपल्यानंतर केलेले अपील विचारार्थ स्वीकारु शकेल.

## भाग पाच

### संकीर्ण

**या अधिनियमान्वये केलेल्या कृतीला संरक्षण.** १५. राज्य शासन किंवा राज्य शासनाचा कोणताही अधिकारी किंवा प्राधिकारी यांच्याविरुद्ध त्यांनी या अधिनियमाच्या किंवा या अधिनियमान्वये केलेल्या कोणत्याही नियमांच्या किंवा आदेशांच्या अनुषंगाने सद्भावपूर्वक केलेल्या किंवा करण्याचा उद्देश असलेल्या कोणत्याही कृतीबद्दल कोणताही दावा, खटला किंवा अन्य वैध कार्यवाही करता येणार नाही.

**शाबितीची जबाबदारी.** १६. ज्यावेळी कलम ४ खालील एखाद्या अपराधाबद्दल कोणत्याही व्यक्तीवर खटला भरण्यात आला असेल त्यावेळी, उक्त कलमाखालील अपराध आपण केलेला नाही, हे शाबीत करण्याची जबाबदारी तिच्यावर राहील.

या अधिनियमाखालील अपराध घडल्याचे कळवण्याचे विवक्षित व्यक्तींवरील आबंधन.

१७. (१) या अधिनियमाच्या किंवा त्याअन्वये केलेल्या कोणत्याही नियमाच्या किंवा आदेशाच्या उपबंधांची अंमलबजावणी करण्यास, पोलिसांना मदत करण्यास याद्वारे शासनाच्या सर्व अधिकाऱ्यांना फर्मावण्यात येत आहे आणि त्यांना शक्ती प्रदान करण्यात येत आहे.

(२) सर्व ग्राम अधिकारी आणि एखाद्या क्षेत्राच्या संबंधात जिल्हाधिकारी किंवा जिल्हा दंडाधिकारी विनिर्दिष्ट करील असे इतर अधिकारी आणि अशा क्षेत्राचे रहिवाशी, त्या क्षेत्रात सती जाणे घडण्याच्या बेतात आहे किंवा घडले आहे असे समजण्यात त्यांना कारण असेल किंवा तसे त्यांना माहीत असेल तर त्यांनी अशी वस्तुस्थिती तात्काळ सर्वांत जवळच्या पोलीस ठाण्याला कळवली पाहिजे.

(३) जो कोणी पोटकलम (१) किंवा पोटकलम (२) च्या उपबंधाचे व्यतिक्रमण करील त्यास दोन वर्षांपर्यंत असू शकेल इतक्या मुदतीच्या कोणत्याही वर्णनाच्या कारावासाची शिक्षा देण्यात येईल आणि तो द्रव्यदंडास देखील पात्र असेल.

कलम ४ खालील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली व्यक्ती विवक्षित संपत्ती वारसाने मिळण्यास निरर्ह करणे.

१८. कलम ४ च्या पोटकलम (१) खालील सतीच्या संबंधातील अपराधाबद्दल सिद्धदोष ठरलेली व्यक्ती, जी व्यक्ती सती गेली असेल त्या व्यक्तीची संपत्ती किंवा जी व्यक्ती सती गेली आहे तिच्या मृत्यूनंतर जिची संपत्ती वारसाने मिळण्यास ती हक्कदार झाली असती अशा इतर कोणत्याही व्यक्तीची संपत्ती वारसाने मिळण्यास निरर्ह ठरेल.

१९५१ चा अधिनियम ४३ याचे विशोधन.

१९. लोकप्रतिनिधित्व अधिनियम, १९५१ यामध्ये,—

(क) कलम ८ मधील पोटकलम (२) मध्ये परंतुकानंतर, खालील परंतुक दाखल करण्यात येईल, ते असे :—

"परंतु आणखी असे की, सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८८ चा ३) याच्या कोणत्याही उपबंधांच्या व्यतिक्रमणाबद्दल विशेष न्यायालयाकडून सिद्धदोष ठरविण्यात आलेली व्यक्ती ही अशा दोषसिद्धीच्या दिनांकापासून निरर्ह ठरविण्यात येईल आणि ती तिच्या सुटकेपासून पुढील पाच वर्षांच्या कालावधीपर्यंत निरर्ह असण्याचे चालू राहील.";

(ख) कलम १२३ मध्ये खंड (३क) नंतर, पुढील खंड दाखल करण्यात येईल तो असा :—

"(३ख) उमेदवाराने किंवा त्याच्या प्रतिनिधीने किंवा उमेदवाराच्या किंवा त्याच्या निवडणूक प्रतिनिधीच्या संमतीने अन्य कोणत्याही व्यक्तीने त्या उमेदवाराच्या निवडणुकीवर अनुकूल परिणाम करण्यासाठी किंवा कोणत्याही उमेदवाराच्या निवडणुकीवर प्रतिकूल परिणाम करण्यासाठी, सतीच्या प्रथेचा, किंवा सती जाण्याचा प्रचार करणे किंवा त्या गोष्टी गौरवान्वित करणे.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ "सती" आणि सतीच्या संदर्भात "गौरवान्वित करणे" या शब्दप्रयोगांना सती (प्रतिबंध) अधिनियम, १९८७ (१९८८ चा ३) यामध्ये त्यांना अनुक्रमे जे अर्थ देण्यात आले आहेत तेच अर्थ असतील.".

या अधिनियमाला अधिभावी परिणाम असणे.

२०. या अधिनियमाचे उपबंध अथवा त्याखाली केलेला कोणताही नियम किंवा आदेश, या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणतीही अधिनियमिती किंवा या अधिनियमाव्यतिरिक्त अन्य कोणत्याही अधिनियमितीच्या आधारे अंमलात असणाऱ्या कोणत्याही संलेखामध्ये याच्याशी विसंगत असे काहीही असले तरी, परिणामक होतील.

नियम करण्याची शक्ती.

२१. (१) केंद्र सरकारला, शासकीय राजपत्रातील अधिसूचनेद्वारे या अधिनियमाचे उपबंध कार्यान्वित करण्यासाठी नियम करता येतील.

(२) या कलमाखाली केलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, संसदेच्या प्रत्येक सभागृहापुढे, ते एका सत्राने अथवा दोन किंवा अधिक क्रमवर्ती सत्रे मिळून बनलेल्या एकूण तीस दिवसांच्या कालावधीकरता सत्रासीन असताना, ठेवला जाईल आणि पूर्वोक्त सत्राच्या किंवा क्रमवर्ती सत्रांच्या पाठोपाठचे सत्र संपण्यापूर्वी, जर त्या नियमात कोणताही बदल करण्याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे मतैक्य झाले तर, त्यानंतर तो नियम अशा बदललेल्या स्वरूपातच परिणामक होईल किंवा, यथास्थिति, मुळीच परिणामक होणार नाही ; तथापि, अशा कोणत्याही बदलामुळे किंवा शून्यीकरणामुळे, तत्पूर्वी त्या नियमान्वये करण्यात आलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेला बाध येणार नाही.

विद्यमान कायद्यांचे निरसन. २२. (१) या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी कोणत्याही राज्यात अंमलात असलेले सती जाण्यास गौरवान्वित करण्यास प्रतिबंध करण्याचा उपबंध करणारे सर्व कायदे, अशा प्रारंभानंतर निरसित ठरतील.

(२) असे निरसन झाले असेल तरीही, पोटकलम (१) अन्वये निरसित झालेल्या कोणत्याही कायद्याअन्वये केलेले काहीही किंवा केलेली कोणत्याही कार्यवाही या अधिनियमाच्या तत्सम उपबंधान्वये करण्यात आल्याचे मानण्यात येईल आणि विशेषत: अशा निरसित झालेल्या कोणत्याही कायद्याच्या उपबंधान्वये विशेष न्यायालयाने दखल घेतलेल्या आणि त्या राज्यात या अधिनियमाच्या प्रारंभाच्या लगतपूर्वी त्याच्या पुढे प्रलंबित असलेल्या कोणत्याही प्रकरणासंबंधात अशा प्रारंभानंतर त्या विशेष न्यायालयाकडून, जणू काही असे न्यायालय या अधिनियमाच्या कलम ९ अन्वये घटित झाले असल्याप्रमाणे कार्यवाही चालू ठेवण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई